# मुंबई विद्यापीठ

कुलसचिव यांचे कार्यालय
फोर्ट परिसर, मुंबई विद्यापीठ,
मुंबई ४०० ०३२

No. REG/ICC/2020-2/13

## परिपत्रक

**विषय** : कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे विद्यार्थ्यांच्या शुल्का संदर्भात.

**संदर्भ** : **१)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्रमांक D.O.No.F.1-1/2020/UGC (TF-COVID-19 /Fee) dated 27th May, 2020

२) आखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद परीपत्रक क्र. F.No.: 1-104/AICTE/PGRC/2020 dated 03.09.2020

**३)** विद्यापीठाचे परिपत्रक क्र. REG/ECC/2020-21-UG 1 दि. २१ जुन, २०२०

४) No. REG/ICC/2020-21-07 दिनांक : २० ऑगस्ट, २०२०

उपरोक्त नमुद विषय तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व आखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद परीपत्रक (AICTE) यांचे संदर्भांकित पत्रान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की कोविड – १९ या जागतिक महामारीमुळे दिनांक २३ मार्च, २०२० पासून केंद्र शासनाने संपर्ण देशात टाळेबंदी जाहीर केलेली आहे. त्यामुळे राज्यातील उद्योगधंदे / व्यवसाय /खाजगी नोकरी इत्यादी क्षेत्राात काम करणा–या नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला आहे.

उपरोक्त नमुद संदर्भ क्र. ३ नुसार विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व महाविद्यालयांनी, स्वयं अर्थसहाय्यित (Self Financing) अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क (Tuition Fees) अदा करण्यासाठी चार हप्त्यांपर्यंतची (Instalments) सुविधा उपलब्ध करुन दयावी याबाबत विद्यापीठाने सुचना केल्या होत्या. तरी याबाबत संबंधितांना असे कळविण्यात येते आहे की, विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करून संबंधित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ या वर्षाकरीता कोणत्याही शैक्षणिक शुल्कात वाढ करु नये तसेच गरजू विद्यार्थ्याने विनंती केल्यास त्याच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करुन विद्यार्थ्यांना संपूर्ण शुल्क अदा करण्यासाठी पुरेशा कालावधीसाठी ४ समान हप्त्यांची (Instalments) सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

तरी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व आखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद (AICTE) तसेच मुंबई विद्यापीठ यांचे मार्गदर्शक सुचनाचे पालन करावे.

**ठिकाण : मुंबई -४०००३२**
**दिनांक : २५/०९/२०२०**

**(डॉ. विनोद पाटील)**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक / विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख व संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था.